# नागपूर जिल्हा परिषद मालकीचे आठवडी बाजार लिलाव कार्यक्रम सन २०२०-२१

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी नागपूर जिल्हा परिषद मालकीच्या आठवडी बाजाराचा लिलाव/फेरलिलाव करावयाचा आहे.यास्तव संबधित आठवडी बाजार लिलावापासून मागील तीन वर्षाचे सरासरी उत्पन्न रुपये <u>१०,०००/- चे</u> वर असलेल्या आठवडी बाजाराचा लिलाव जिल्हा परिषद स्तरावर तसेच मागील तीन वर्षाचे सरासरी उत्पन्न रुपये **<u>१०,०००/- पर्यत</u>** असलेल्या आठवडी बाजाराचा लिलाव/फेरलिलाव पंचायत समिती स्तरावर आयोजित केलेला आहे.करिता इच्छुक लिलाव बोली बोलणा-यानी खालील नमुद दिवशी,ठिकाणी **<u>सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहावे</u>**

**लिलाव दि.१४/२/२०२० वेळ दुपारी १.०० वाजेपासुन स्थळ - कै.आबासाहेब खेडकर सभागृह,जि.प.नागपूर**

### १. रुपये १०,००१/- ते ५०,०००/- पर्यत उत्पन्न असलेले आठवडी बाजार

| पंचायत समिति | अ क्र | आ.बाजाराचे नांव | पंचायत समिति | अ क्र | बाजाराचे नांव | पंचायत समिति | अ क्र | आ.बाजाराचे नांव | पंचायत समिति | अ क्र | आ.बाजाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नागपूर | १ | पेठकालडोगरी | कामठी | २ | भुगाव | रामटेक | ३ | पंचाळा | पारशिवनी | ४ | नवेगाव/खै |

### २.रुपये ५०,०००/- चे वरील उत्पन्न असलेले आठवडी बाजार

| पंचायत समिति | अ क्र | आठवडी बाजाराचे नांव | पंचायत समिति | अ क्र | बाजारा चे नांव | पंचायत समिति | अ क्र | आ.बाजाराचे नांव | पंचायत समिति | अ क | आ.बाजाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नागपूर | १ | बाजारगाव | रामटेक | ३ | मनसर | रामटेक | ५ | देवलापार | रामटेक | ७ | हिवरा/बा |
| कामठी | २ | वडोदा | | ४ | नगरधन | | ६ | पवनी | | ८ | काचुरवाही |

### ३. पंचायत समिती स्तरावर होण्या-या रुपये १०,०० ०/- पर्यत उत्पन्न असलेले आठवडी बाजार

| पंचायत समिति | अक्र | आठवडी बाजाराचे नांव | लिलाव दिनांक | लिलाव स्थळ |
|---|---|---|---|---|
| पारशिवनी | १ | दहेगाव/जोशी | /१/२०२० | पं.स.कार्यालय पारशिवनी |

**लिलाव दि.- १५/२/२० वेळ दुपारी १.०० वाजेपासुन स्थळ - कै.आबासाहेब खेडकर सभागृह,जि.प.नागपूर**

### १. रुपये १०,००१/- ते ५०,०००/- पर्यत उत्पन्न असलेले आठवडी बाजार

| पं. समिति | अ.क्र | आठवडी बाजाराचे नांव | पंचायत समिति | अ.क्र | आ.बाजाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| मौदा | १ | गोवरी | सावनेर | २ | नागलवाडी |

### २.रुपये ५०,०००/- चे वरील उत्पन्न असलेले आठवडी बाजार

| पं. समिति | अक्र | बाजाराचे नांव | पं. समिति | अ.क | बाजाराचे नांव | पं समिति | अ क्र | बाजाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मौदा | १ | निमखेडा | सावनेर | ४ | भानेगाव | कुही | ७ | साळवा |
| | २ | कोदामेंढी | कुही | ५ | मांढळ | | ८ | जिवनापुर |
| | ३ | अरोली | | ६ | वेलतुर | भिवापुर | ९ | नांद |

**लिलाव दि.- १७/२/२०२० वेळ दुपारी १.०० वाजेपासुन स्थळ - कै.आबासाहेब खेडकर सभागृह,जि.प.नागपूर**

### १. रुपये १०,०००/- ते ५०,०००/- पर्यत उत्पन्न असलेले आठवडी बाजार

| पं. समिति | अक | आठवडी बाजाराचे नांव | पंचायत समिति | अ.क्र | आठवडी बाजाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| उमरेड | १ | पिपरा | हिंगणा | ३ | अडेगाव |

### २. रुपये ५०,०००/- चे वरील उत्पन्न असलेले आठवडी बाजार

| पं. समिति | अक्र | बाजाराचे नांव | पं. समिति | अक्र | बाजाराचे नांव | पं.समिति | अ.क्र | आ.बाजाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरेड | १ | सिर्सि | उमरेड | ४ | सुरगाव/उ. | हिंगणा | ७ | टाकळघाट |
| | २ | बेला | | ५ | मकरधोकडा | | ८ | गुमगाव |
| | ३ | चांपा | हिंगणा | ६ | रायपुर/हिं. | | ९ | कान्होलीबारा |

नागपूर जिल्हा परिषदेने, नागपूर जिल्हा परिषद ( बाजारातील कर व फी वसुलीबाबत) नियम,१९६९ चे नियम ६ मधील पोट नियम ६(१) ते ६(२२) व जिल्हा परिषद ( बाजारातील कर व फी वसुलीबाबत) द्बितिय सुधारणा १९७१ चे नियम क्रमाक ६(३,४)रदद करुन त्याऐवजी पोट नियम ६(१) ते ६(२३) तसेच आठवडी बाजार फी (पट्टी)चे सन २००० चे दरात संशोधन करुन सुधारीत नियमावली व आठवडी बाजार फी (पट्टी)चे दरास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने दिनांक २८/१/२०१५ चे ठराव क्र.३ अन्वये मंजुरी प्रदान केली असुन,सुधारीत नियमावली व आठवडी बाजार फी (पट्टी)चे दर महा.शासन राजपत्रात ३०एप्रिल,२०१५ मध्ये प्रकाशित करण्यात आले तसेच ३०एप्रिल,२०१५ मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या पोट नियम क्र.६(७,१०) मध्ये दुरुस्ती व नविन नियम ६(२४) नियमात समाविष्ट करण्याबाबत जिल्हा परिषदेची विशेष सभा दिनांक २२/३/२०१६ चे विषय क्र.५ ठराव क्र ५ नुसार मंजुरी प्रदान केली असुन,सदर सुधारित नियम व नविन नियम महा.शासन राजपत्रात ऑगस्ट २०१६ मध्ये प्रकाशित करण्यात आले.त्यानुसार जिल्हा परिषद नागपुरच्या मालकीचे आठवडी बाजार लिलावाचे नियम (कार्यपध्दती),अटी व शर्ती याप्रमाणे आहेत

१)आठवडी बाजार लिलाव ठरलेल्या कार्यक्रमानुसार नमुद केलेल्या दिवशी ठिकाणी व ठराविक वेळेत जाहीर बोलीद्बारे करण्यात येईल.

२) आठवडी बाजार लिलावाची आवश्यक प्रक्रिया शक्यतो ३१ मार्च पर्यत पुर्ण करुन संबंधित जास्तीत जास्त रक्कमेची बोली बोलणा-या व्यक्तीचे लिलाव बोलीस मंजुरी तसेच बाजारपट्टी वसुलीचे अधिकार १ एप्रिलला देण्यात येईल.

३) जिल्हा परिषद मालकीचे रु.१०,०००/-पर्यतच्या आठवडी बाजाराचा लिलाव पंचायत समिती स्तरावर व त्यावरील रक्कमेच्या बाजारांचा लिलाव जिल्हा परिषद स्तरावर घेण्यात येईल.

४)लिलाव अधिकारी-जिल्हा परिषद स्तरावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचा.) व पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी संबंधित पंचायत समिती हे राहतील.

५) मागील तीन वर्षातील लिलावाची सरासरी रक्कम काढुन त्यानुसार शासकिय बोलीची रक्कम ठरविण्यात येईल.

६) आठवडी बाजार लिलाव रक्कम सरासरी रक्कमेपेक्षा(शासकिय बोली)कमी येत असल्यास लिलाव अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर किमान ३ वेळा लिलावाची कार्यवाही करावी.लिलावाची कार्यवाही ३ वेळा करुनही लिलाव होवु न शकल्यास किंवा योग्य बोली प्राप्त न झाल्यास वाटाघाटीद्बारे ठेका देण्याचे अधिकार लिलाव अधिकारी यांना राहतील.परंतु अंतीम मंजुरी सक्षम लिलाव मंजुरी प्रधिकारी यांनी दिल्याशिवाय लिलाव कायम झाला असे समजण्यात येणार नाही.

७)मागील ३ वर्षातील लिलावाची सरासरी रक्कम रु.१०,०००/-पर्यत असलेल्या आठवडी बाजारासाठी लिलाव बोली बोलण्यापुर्वी बोलीकरिता मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचे नावे राष्ट्रीयकृत बॅकेचा रु.२०००/-चा डिमांड डॅाफ्ट (धनाकर्ष)तसेच मागील ३ वर्षातील लिलावाची सरासरी रक्कम रु.१०,००१ ते ५०,०००/-पर्यत असलेल्या आठवडी बाजारासाठी लिलाव बोली बोलणेपुर्वी बोलीकरिता रु. १०,०००/- व मागील तीन वर्षातील लिलावाची सरासरी रक्कम रु.५०,०००/-चे वर असलेल्या आठवडी बाजारासाठी लिलाव बोली बोलणेपुर्वी बोलीकरिता रु.२५,०००/-डिमांड डॅाफ्ट(धनाकर्ष)लिलावस्थळी प्रथम जमा करावा लागेल,त्यानंतरच संबंधित व्यक्ती बोली बोलण्यास पात्र राहील.

८) ज्यांचे नावे लिलावाची बोली शासकिय रक्कमेपेक्षा जास्तीत जास्त रक्कमेवर झाली त्यांनी लिलाव रक्कमेचे किमान ५० टक्के रक्कम लिलावाचे ठिकाणीच त्वरीत जमा करावी लागेल.लिलाव रक्कम त्वरीत जमा न केल्यास बोलीकरिता जमा केलेला डिमांड डॉफ्ट(धनाकर्ष)जप्त करुन जिल्हा परिषद फंडात जमा करण्यात येईल.लिलाव रक्कम भरणा-याच्या बाबतीत डिमांड डॉफ्टची रक्कम (धनाकर्ष) लिलाव रक्कमेत समाविष्ट करण्यात येईल/डिमांड डॉफ्ट(धनाकर्ष) लिलावधारकास परत करण्यात येईल.

९) आठवडी बाजार लिलाव रक्कम एकमुस्त लिलावाचे दिवशी वसुल करण्यात येईल.परंतु लिलावाचे दिवशी पुर्ण रक्कम जमा करणे शक्य नसल्यास किमान ५० टक्के रक्कम लिलावाचे दिवशी व उर्वरित रक्कम ७ दिवसाचे आंत जमा करणे लिलावधारकास बंधनकारक राहील.लिलाव रक्कम जमा करण्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार त्या स्तरावरील लिलाव अधिकारी यांना राहतील.

१०)लिलाव बोली मंजुरीकरिता प्रस्तावीत नसलेल्या ठेकेदारांना लिलावात भाग घेण्याकरिता जमा केलेला संबंधित ठेकेदाराचा त्या-त्या रक्कमेचा डिमांड डॅाफ्ट (धनाकर्ष) सर्व बाजार लिलाव बोलीचा कार्यक्रम झाल्यानंतर परत करण्यात येईल.

११)लिलावाचे वेळी ३ बोलीवर लिलावाची रक्कम स्विकारण्यात येईल.मात्र अंतीम मंजुरी सक्षम अधिका-या कडुन/प्राधिकरणाकडुन प्राप्त झाल्याशिवाय लिलाव पक्का झाला असे समजण्यात येणार नाही.

१२)लिलाव मंजुरी प्रधिकारी - रु.५०००/- पर्यतच्या लिलावास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची व रु.५००१/- ते ५०,०००/-पर्यतच्या लिलावास स्थायी समिती सभा तसेच रु.५०,०००/-चे वरील लिलावास सर्वसाधारण सभा जिल्हा परिषद नागपूरच्या मंजुरीचे अटीचे आधिन राहील.

१३)आठवडी बाजाराच्या रु.१० लाखापर्यतचे लिलाव बोली(रक्कमे)करिता रु.५००/-चे स्टॅम पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.आठवडी बाजाराची लिलाव बोली(रक्कम) रु.१० लाखापेक्षा जास्त असेल तर रु.१० लाखावरच्या बोलीस(मुल्यास) ०.१ टक्के(जास्तीत जास्त रु.२५लाख लिलाव बोली पर्यत)नुसार येणारी किंमत रु.+(अधिक)५००/-अश्या प्रकारे एकुण किंमतीच्या(मुंद्राक)स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.

१४)लिलावात भाग घेवुन लिलाव घेतल्यानंतर जिल्हा परिषद आठवडी बाजार लिलावाबाबतची थकबाकी असल्याचे आढळुन आल्यास आठवडी बाजार लिलाव थकबाकीची रक्कम संबंधित लिलाव घेणा-या ठेकेदाराकडुन वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.याबाबत कोणतीही सबब ऐकल्या जाणार नाही.

१५)बाजार लिलावाची जी रक्कम वसुलपात्र असेल ती भरण्यास संबंधित ठेकेदाराने कुचराई केल्यास जी रक्कम वसुलपात्र असेल ती जमीन महसुलाची थकबाकी म्हणुन वसुल केल्या जाईल.

१६)ठेकेदाराला किंवा बाजार अधिक्षकामार्फत ठेकेदाराने नियुक्त केलेल्या प्रतिनिधीला परिशिष्ट'अ'मध्ये दिलेल्या दराने किंवा त्यात जिल्हा परिषदेने संशोधन केले असल्यास सुधारित दराने बाजारपट्टी वसुल करता येईल.

१७)लिलावधारकास बाजारचिठ्ठी वसुली पावती बुकाकरिता प्रती बुक रु.५.५०/-प्रमाणे किंवा वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे जिल्हा निधी फंडात पावती/चालानद्वारे जमा केल्यावरच बाजारचिठ्ठी वसुली पावती बुक देण्यात येईल.

१८) आठवडी बाजारात मौक्याचे ठिकाणी स्वखर्चाने दर फलक लावण्याबाबत ठेकेदाराला सुचना करण्यात येईल.

१९)लिलाव घेणा-या ठेकेदारांना आठवडी बाजार पोट ठेक्याने देता येणार नाही.तसे केल्याचे आढळुन आल्यास लिलावाची जमा केलेली रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल.

२०)आठवडी बाजाराच्या जागेची साफसफाई संबधित बाजार ठेकेदाराला बाजाराच्या दिवशी व दुस-या दिवशी स्वखर्चाने करावी लागेल.

२१) लिलाव मंजुर/नामंजुर करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेकडे सुरक्षित राहतील.

२२)लिलावाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर हे अपीलीय अधिकारी राहतील व त्यांचा निर्णय संबंधित लिलावधारकावर बंधनकारक व अंतीम राहील.

२३)सदर्हु प्रकरणी मा.न्यायालयीन बाब निर्माण झाल्यास नागपूर न्यायालयाचे क्षेत्रात प्रकरण दाखल करणे बंधनकारक राहील.

२४)जिल्हा परिषद मालकीचे आठवडी बाजार लिलावाचे नियम(कार्यपध्दती),अटी व शर्तीचे तसेच जिल्हा परिषदेकडे सादर केलेल्या करारनाम्याचे बाजार ठेकेदाराने उल्लंघन केल्याचे सिध्द झाल्यावर संबंधित ठेकेदाराचे नांवे असलेला बाजारपट्टी वसुलीचे अधिकार/ठेका रद्द करुन,जिल्हा परिषदेकडे जमा असलेली लिलाव रक्कम जप्त करुन,आठवडी बाजाराचा फेरलिलाव करण्यात येईल.

**टिप-१..**इच्छुक बोलीदारास लिलाव बोली सुरु होणेपुर्वी १)आ.बाजाराचे सरासरी उत्पन्न रु.१०,०००/-पर्यत असलेल्या आ.बाजाराकरिता २०००/-२)सरासरी उत्पन्न रु.१०,००१ ते ५०,०००/-पर्यत असलेल्या आठवडी बाजाराकरिता १०,०००/- व ३)सरासरी उत्पन्न रु.५०,०००/- चे वर असलेल्या आठवडी बाजाराकरिता २५,०००/चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड डॅाफ्ट मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जि.प.नागपूर किंवा CAFO, Z.P.NAGPUR यांचे नांवे असलेला(धनाकर्ष)व स्वत:चे ओळखपत्र लिलाव स्थळी दिल्याशिवाय लिलाव बोलीत भाग घेता येणार नाही.

२. लिलाव बोलीची रक्कम रोख/राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड डॉफ्ट (धनाकर्ष)/धनादेशाद्वारे स्विकारण्यात येईल.

३. लिलावाच्या सविस्तर अटी व शर्ती पंचायत विभाग जि.प.नागपूर व गट विकास अधिकारी पं.स.कार्यालय येथे पाहावयास मिळतील.

४. दिनांक १४/२/२०२० रोजी आठवडी बाजार लिलाव बोलीची रक्कम सरासरी पेक्षा जास्त न आल्यास दिनांक १५/२/२०२० रोजी फेरलिलाव घेण्यात येईल.दिनांक १५/२/२०२०रोजी आठवडी बाजार लिलाव बोलीची रक्कम सरासरीपेक्षा जास्त न आल्यास दि.१७/२/२०२० रोजी फेरलिलाव घेण्यात येईल.दि.१७/२/२०२० रोजी आठवडी बाजार लिलाव बोलीची रक्कम सरासरीपेक्षा जास्त न आल्यास दि. १८/२/२०२० रोजी फेरलिलाव घेण्यात येईल.तरी इच्छुक बोलीदरांनी **कै.आबासाहेब खेडकर सभागृह,जि.प.नागपूर येथे सकाळी १०.०० वाजता** उपस्थित राहावे.

(कार्यालयीन प्रत मा.मु.का.अ.द्वारा अनुमोदीत)

- स्वा-

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद नागपूर करिता